# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०६/२०२६ (शुक्रवार )**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. मोबाईल, दुचाकी वाहनासह २ लाख १० हजार ९५० रूपयांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ११/०६/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने पोलीस स्टेशन कन्हान हद्दीतील टेकाडी शिवारातील खदान क्रमांक ६ परीसरातील झाडीझुडपामध्ये सुरू असलेल्या जुगार अड्डयांवर धाड टाकली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कन्हान पोलीसांसोबत संयुक्तरित्या कारवाई करत घटनास्थळी धाड टाकुन आरोपी नामे **१) विजय केवलदास गेडाम, वय ४० वर्ष, रा. जे.पी. नगर, कामठी, नागपुर ,२) मोहसिन मोविन शेख, वय ३५ वर्ष, रा. मदन चौक, कामठी, नागपुर ,३) निलेश मुनेश नानेट, वय ४० वर्ष, रा. नया गोदाम, प्रबुध्द नगर, कामठी नागपुर , ४) मोबीदउर रहमान अब्दुल रशिद, वय ३० वर्ष, रा. लकडगंज, कामठी, नागपुर, ५) सुरज रघुवीर मेश्राम, वय ३५ वर्ष, रा. जुनी खलाशी लाईन, कामठी, नागपुर , ६) शारूख खान शमशेर खान, वय ३० वर्ष, रा. कोळसा टाल , कामठी ७) सचिन प्रकाश यादव, वय ३९ वर्ष, रा. वार्ड क. ०३ कन्हान नागपुर, यांना जागीच ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना पकडले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम ४०६००/—रुपये, हिरो होंडा स्प्लेंडर मो.सा. एम एच ३१ ए यु ८५९२ दरी, एलईडी लाईट आणि इतर साहीत्य असा एकुण २,१०,९५०/— रूपयांचा माल पंचासमक्ष जप्त केला आहे.**

# खापा पोलीस स्टेशन हद्दीतील हदद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत गुन्हेगाराला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन खापा हदद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय आरोपी **आकाश बल्लुजी चौधरी , वय २८ वर्षे, रा बडेगाव, ता. सावनेर, जि. नागपुर याला** महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

सराईत गुन्हेगार नामे आरोपी **आकाश बल्लुजी चौधरी , वय २८ वर्षे, रा बडेगाव, ता. सावनेर, जि. नागपुर याचे**वर अवैध दारू बाबत **अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **आकाश बल्लुजी चौधरी , वय २८ वर्षे, रा बडेगाव, ता. सावनेर, जि. नागपुर याला ३ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्‌दपार आरोपी आकाश बल्लुजी चौधरी**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, पारशिवणी पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक १२/०६/२०२६ रोजी पारशिवणी पोलीस अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा तामसवाडी शिवारात (डोंगे घाट) कन्हान नदीचे पात्रातून एका ट्रॅक्टरच्या सहाय्याने अवैधरित्या रेती उत्खनन करून चोरी करून वाहतूक करीत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे घटनास्थळी जात असतांना डोंगे घाटाकडुन रोडनी तामसवाडी कडे एक ट्रॅक्टर येतांना दिसला. सदर ट्रॅक्टर थांबवुन चालकास पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव **प्रविण सुदाम भड, वय ४४ वर्ष, रा. वार्ड क्रमांक ०३ तामसवाडी ता. पारशिवनी जि. नागपुर** अशी माहीती समजले.

**पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर क्रमांक एम एच ४० बिजे १९९८ आणि विना क्रमांकाची ट्रॉली एकुण किमती ५,००,०००/—रूपये आणि १ ब्रास रेती असा एकुण ५,०६,००० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे पारशिवणी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७)(८), खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम १९५७ चे कलम ४/२१, सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३ तसेच पर्यावरण संरक्षण**

**अधिनियम १९८६ चे कलम १५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे दृ**



## पोलीस स्टेशन अरोली अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ५ गुन्हे नोंद

दिनांक ११/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन अरोली येथे १) यथार्थ जितेन्द्र लिमजे, वय २१ वर्ष, रा. कोदामेढी, ता.मौदा, जि.नागपुर हा मौजा भांडेवाडी येथे अंमली पदार्थाचे सेवन करतांना मिळुन आला. २) रोहन संतोश निर्मलकर, वय २१ वर्ष, रा. कोदामेढी, ता.मौदा, जि.नागपुर, हा मौजा कारगाव येथे येथे अंमली पदार्थाचे सेवन करतांना मिळुन आला. ३) आर्यन विजय सोनवाने, वय १९ वर्ष, रा. कोदामेढी, ता.मौदा, जि.नागपुर , ४) प्रशांत मोरेश्वर ढोमणे, वय ३१ वर्ष, रा. कोदामेढी, ता.मौदा, जि.नागपुर हा आणि ५) आकीब मोबीण पठाण, वय २८ वर्ष, रा. कोदामेढी, ता.मौदा, जि.नागपुर हे तिघे मौजा कोदामेंढी येथे अंमली पदार्थाचे सेवन करतांना मिळुन

आले. **नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ०५ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

दिनांक ११/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, असा एकुण ९५४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे चंदु नत्थुजी लेदाळे, वय ४७ वर्ष, रा मालेवाडा,ता भिवापुर, जि नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** प्रशांत तुकाराम नागमोते वय ४४ वर्ष रा. दिंदरगाव त. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी संतोष भारत उईके, वय ३५ वर्ष, रा. रामडोंगरी ता. सावनेर, जि. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे आरोपी मोहन शामराव बेहुने वय ३६ वर्ष रा. मेहंदी त.पारशिवनी जि.नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे महीला आरोपी हीचे वर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण २१९६० मिली देशी दारू, ११ मोहाफुल दारू, ०१ मोटरसायकल असा एकुण ६१,३७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने